19 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनाची इमारत वर्षभरात उभारणार

## शिवाजी विद्यापीठात पालकमंत्री आबिटकर यांच्या हस्ते भूमिपूजन

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी कोनशिलेचे अनावरण पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, विजय ककडे, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आज करण्यात आले. या इमारतीसाठी शासनस्तरावरून सर्वतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही त्यांनी दिली. वर्षभरात ही इमारत उभारण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारून, तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी इमारतीच्या कामाविषयी, तसेच अध्यासनाच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

'एरवी शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी आज प्रथमच अनेक दात्यांच्या हातून देणगीनिधी स्वीकारण्याची दुर्मीळ संधी लाभली. विद्यापीठाने समाजाशी नाते जोडल्याने या अध्यासनाच्या कामाची उंची वाढली असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले. 'अध्यासनाची इमारत आणि परिसर पर्यावरणपूरक असेल. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे, अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी या अध्यासनाच्या उभारणीसाठी दिलेल्या योगदानाचा कुलगुरू डॉ. शिर्के यांनी उल्लेख केला.

या कार्यक्रमात रावसाहेब देशपांडे-आणेगिरीकर, सुरेश रोटे, प्रफुल्ल चमकले, महावीर बिंदगे, आण्णासाहेब इसराणा, नेमचंद संगवी यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. जैन सेवा संघाचे डॉ. मिठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ लाख ११ हजार रुपयांची, कुंतिनाथ हानगंडे आणि अनिल ढेकणे यांनी ५१ हजार रुपयांची देणगी दिली. यावेळी डॉ. बी. डी. खणे, एन. एम. पाटील, जीवंधर चौगुले, वसंत नाडे, अरुण माणगावे, अरुणा पाटील, श्री. राजोबा, उपकुलसचिव रणजित यादव, विजय पोवार, गिरीश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटी रुपयांचा निधी लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी. ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी आभार मानले.

### एक कोटींच्या निधीतून इमारतीचे बांधकाम

■ लोकवर्गणीतून सुमारे एक कोटी ११ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, त्यामधूनच पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम केले जाणार आहे. त्यासाठी ८४ लाख ५ हजार ४०१ रुपये इतका खर्च प्रस्तावित आहे.

19 APR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनाला शासनाचे सहकार्य

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व परिसरात अध्यासन इमारतीचे भूमिपूजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासनस्तरावरून सर्वतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. विद्यापीठाच्या परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी सकाळी झाले. भूमिपूजनानंतर झालेल्या समारंभात ते बोलत होते.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारून, तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमिपूजन करण्यात आले. पालकमंत्री आबिटकर म्हणाले, एरव्ही शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी प्रथमच अनेक दात्यांच्या हातून देणगी निधी स्वीकारण्याची दुर्मीळ संधीही लाभली. आपल्या कष्टाची मिळकत आपण अध्यासनासाठी देत आहात, ही उल्लेखनीय बाब आहे.



भगवान महावीर अध्यासन इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिलेचे अनावरण करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे आदी.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणावर भर आहे. भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे, अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी अध्यासनाच्या उभारणीसाठी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटींचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी. ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी अध्यासनाला उत्स्फूर्तपणे देणगी जाहीर केल्या. त्यामध्ये रावसाहेब देशपांडे-आणेगिरीकर, सुरेश रोटे, प्रफुल्ल भालचंद्र चमकले, ॲड. महावीर बिंदगे, जयसिंगपूरचे प्रा. आण्णासो इसराणा, उद्योजक नेमचंद संगवी यांनी प्रत्येकी एक लाखाची देणगी जाहीर केली. जैन सेवा संघाचे डॉ. मिठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ लाख ११ हजार रुपयांची, तर कुंतिनाथ हानगंडे आणि अनिल ढेकणे यांनी ५१ हजारांची देणगी दिली. कार्यक्रमास पूर्वीचे देणगीदार डॉ. बी. डी. खणे, डॉ. एन. एम. पाटील, जीवंधर चौगुले, वसंत नाडे, अरुण माणगावे, अरुणाताई पाटील आदी उपस्थित होते. प्रकल्पपूर्तीसाठी मदत करणारे राजोबा आणि त्यांचे सहकारी, विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजित यादव, विजय पोवार आणि त्यांचे सर्व सहकारी, डॉ. गिरीश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### एक कोटी ११ लाखांचा निधी जमा

भगवान महावीर अध्यासन हे लोकवर्गणीतून उभे करण्याचे विद्यापीठाने ठरवले आणि त्यानुसार लोकवर्गणीसाठी आवाहन करण्यात आले. त्यामधून सुमारे १ कोटी ११ लाखांचा निधी प्राप्त झाला असून, त्यामधूनच पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या कामासाठी ८४ लाख ५ हजार ४०१ रुपये इतका खर्च प्रस्तावित असून, १२ महिन्यांत हे काम पूर्ण करावयाचे आहे. सांगलीचे प्रमोद चौगले हे या कामाचे वास्तुविशारद आहेत.

19 APR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात महावीर अध्यासन इमारतीचे भूमिपूजन

## पालकमंत्री आबिटकर यांची उपस्थिती : शासनाकडून सहकार्य करण्याची ग्वाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासनस्तरावरून सर्वतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही शुक्रवारी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते सकाळी झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी देणगीदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन झाले व तिथेच कोनशिलेचे अनावरण झाले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांना यावेळी इमारतीच्या कामाविषयी तसेच अध्यासनाच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिलीअध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटींचा निधी लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.



विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिलेचे अनावरण कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### यांनी केली देणगी जाहीर

**१ लाख ११ हजार :** जैन सेवा संघाचे डॉ. मिठारी आणि त्यांचे सहकारी

**प्रत्येकी १ लाख :** रावसाहेब देशपांडे, आणेगिरीकर, सुरेश रोटे, प्रफुल्ल भालचंद्र चमकले, ॲड. महावीर बिंदगे, जयसिंगपूरचे प्रा. आण्णासो इसराणा, उद्योजक नेमचंद संगवी.

**५१ हजार :** कुंतीनाथ हानगंडे, अनिल ढेकणे

### एक कोटी ११ लाख जमा

आतापर्यंत लोकवर्गणीतून १ कोटी ११ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, त्यामधूनच पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या कामासाठी ८४ लाख ५ हजार ४०१ रुपये इतका खर्च प्रस्तावित असून, १२ महिन्यांत हे काम पूर्ण करायचे आहे. सांगलीचे प्रमोद चौगले हे या कामाचे वास्तुविशारद आहेत.

19 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनाला सर्वतोपरी सहकार्य

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; शिवाजी विद्यापीठात भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासनस्तरावरून सर्वतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने समाजाशी नाते जोडल्याने या अध्यासनाच्या कामाची उंची वाढली आहे. हे कोल्हापुरातच होऊ शकते. विद्यापीठाने आपल्या विविध अध्यासनांच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे भरीव कार्य केले.आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राचे एक भूषणच ठरले आहे.



कोल्हापूर : विद्यापीठात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या कोनशिला अनावरणप्रसंगी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. अपरिग्रह, अहिंसा आणि ब्रह्मचर्य या जैन तत्त्वज्ञानावर आधारित असणारे भगवान महावीर अध्यासन हीच भूमिका घेऊन वाटचाल करीत आहे. डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संजय शेटे प्रा. डी. ए. पाटील यांची भाषणे झाली. शुभम पाटील यांनी आभार मानले.

19 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भगवान महावीर अध्यासनासाठी सर्वोतोपरी सहकार्य

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर : शिवाजी विद्यापीठात अध्यासन इमारतीचे भूमीपूजन

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने आपल्या विविध अध्यासनांच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे भरीव कार्य केले आहे. आता नव्याने भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरुन सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमीपूजन व कोनशिलेचे अनावरण मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : भगवान महावीर अध्यासन इमारतीचे भूमीपूजन करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

मंत्री आबिटकर म्हणाले, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी आज अनेक दात्यांनी देणगी देवून सहकार्य केले आहे. कष्टाची मिळकत आपण अध्यानासाठी देणे ही उल्लेखनीय बाब आहे. शिवाजी विद्यापीठाने समाजाशी नाते जोडल्याने या अध्यासनाच्या कामाची उंची वाढली आहे. शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राचे एक भूषणच ठरले आहे, असे गौरवोद्‌गारही त्यांनी काढले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, भगवान महावीर यांचे तत्वज्ञान मानवी मूल्यशिक्षणच आहे. अपरिग्रह, अहिंसा आणि ब्रह्मचर्य तत्वज्ञानावर आधारित भगवान महावीर अध्यासन हीच भूमिका घेऊन वाटचाल करणार आहे.

संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### एक कोटी ११ लाखांचा निधी जमा

भगवान महावीर अध्यासनासाठी लोकवर्गणीतून सुमारे १ कोटी ११ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असून त्यामधूनच पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या कामासाठी ८४ लाख ५ हजार ४०१ रुपये इतका खर्च प्रस्तावित असून एका वर्षात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2025
लोकसत्ता

# भगवान महावीर अध्यासनाला सहकार्य - प्रकाश आबिटकर

**कोल्हापूर :** भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरून सर्वोतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही आरोग्य तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी येथे दिली.

शिवाजी विद्यापीठात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले, एरव्ही शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, या अध्यासनासाठी अनेक दात्यांच्या हातून देणगी, निधी स्वीकारण्याची दुर्मीळ संधीही लाभली. दातृत्वातून मिळणारा आनंद मोठा असतो.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे, अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी या अध्यासनाच्या उभारणीसाठी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे.



महावीर अध्यासन इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिलेचे अनावरण करताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर.

प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाचा तीन कोटींचा निधी मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी.ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. याप्रसंगी मान्यवरांनी अध्यासनाला एक कोटी ११ लाखांचा निधी जमा केला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

# भगवान महावीर अध्यासनासाठी शासनाकडून सर्वोतोपरी सहकार्य : पालकमंत्री प्रकाश आबिटकर

## शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व परिसरात अध्यासन इमारतीचे भूमीपूजन

सां. नवयुग/प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरुन सर्वोतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही आज महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमीपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. भूमीपूजनानंतर झालेल्या समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारुन तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमीपूजन करण्यात आले

पालकमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, एरव्ही शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी आज प्रथमच अनेक दात्यांच्या हातून देणगीनिधी स्वीकारण्याची दुर्मिळ संधीही लाभली. आपल्या कष्टाची मिळकत आपण अध्यानासाठी देत आहात, ही उल्लेखनीय बाब आहे. दातृत्वातून मिळणारा आनंद मोठा असतो.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणावर भर आहे. भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. अपरिग्रह, अहिंसा आणि ब्रह्मचर्य या जैन तत्त्वज्ञानावर आधारित असणारे



भगवान महावीर अध्यासन हीच भूमिका घेऊन वाटचाल करीत आहे. अध्यासनाची इमारत आणि परिसर हा जास्तीत जास्त पर्यावरणपूरक असेल, याची दक्षता वास्तुरचनेपासूनच घेण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी.ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमास पूर्वीचे देणगीदार डॉ. बी.डी. खणे, डॉ. एन. एम. पाटील, जीवंधर चौगुले, वसंत नाडे, अरुण माणगावे, अरुणाताई पाटील आदी उपस्थित होते. प्रकल्पपूर्तीसाठी मदत करणारे राजोबा आणि त्यांचे सहकारी, विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजीत यादव, विजय पोवार आणि त्यांचे सर्व सहकारी, डॉ. गिरीश कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या श्रीमती जोशी व श्रीमती कुंभार यांच्यासह जैन श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व परिसरात अध्यासन इमारतीचे भूमीपूजन



। ललकार वृत्त ।

कोल्हापूर, दि.१८ (वार्ताहर) – शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीसाठी शासन स्तरावरून सर्वोतोपरी सहकार्य मिळवून देण्याची ग्वाही आज महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्वेकडील परिसरात भगवान महावीर अध्यासनाच्या इमारतीच्या बांधकामाचे भूमीपूजन मंत्री आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. भूमीपूजनानंतर झालेल्या समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

मंत्री आबिटकर यांच्या हस्ते कुदळ मारून तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमीपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांना यावेळी इमारतीच्या कामाविषयी तसेच अध्यासनाच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली.

पालकमंत्री श्री. आबिटकर म्हणाले, एरव्ही शासन म्हणून आम्ही नेहमी देण्याच्या भूमिकेमध्ये असतो. तथापि, विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी आज प्रथमच अनेक दात्यांच्या हातून देणगीनिधी स्वीकारण्याची दुर्मिळ संधीही लाभली. आपल्या कष्टाची मिळकत आपण अध्यानासाठी देत आहात, ही उल्लेखनीय बाब आहे. दातृत्वातून मिळणारा आनंद मोठा असतो. शिवाजी विद्यापीठाने समाजाशी नाते जोडल्याने या अध्यासनाच्या कामाची उंची वाढली आहे. हे कोल्हापुरातच होऊ शकते. विद्यापीठाने आपल्या विविध अध्यासनांच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे भरीव कार्य केले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राचे एक भूषणच ठरले आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मूल्यशिक्षणावर भर आहे. भगवान महावीर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे मानवी मूल्यशिक्षणच आहे. अपरिग्रह, अहिंसा आणि ब्रह्मचर्य या जैन तत्त्वज्ञानावर आधारित असणारे भगवान महावीर अध्यासन हीच भूमिका घेऊन वाटचाल करीत आहे. अध्यासनाची इमारत आणि परिसर हा जास्तीत जास्त पर्यावरणपूरक असेल, याची दक्षता वास्तुरचनेपासूनच घेण्यात आली आहे. ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. विलास संगवे, अर्थतज्ज्ञ डॉ. जे.एफ. पाटील यांनी या अध्यासनाच्या उभारणीसाठी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. संजय शेटे यांनी अध्यासनासाठी शासनाने जाहीर केलेला तीन कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर मिळण्यासाठी मंत्री आबिटकर यांनी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. डी.ए. पाटील यांनी अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. शुभम पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी अध्यासनाला उत्स्फुर्तपणे देणगी जाहीर केल्या. त्यामध्ये रावसाहेब देशपांडे-आणेगिरीकर, सुरेश रोटे, प्रफुल्ल भालचंद्र चमकले, अॅड. महावीर बिंदगे, जयसिंगपूरचे प्रा. आण्णासो इसराणा, उद्योजक नेमचंद संगवी यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली. जैन सेवा संघाचे डॉ. मिठारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ लाख ११ हजार रुपयांची तर कुंतीनाथ हानगंडे आणि अनिल हेकणे यांनी ५१ हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीदारांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पूर्वीचे देणगीदार डॉ. बी.डी. खणे, डॉ. एन. एम. पाटील, जीवंधर चौगुले, बसंत नाडे, अरुण माणगावे, अरुणाताई पाटील आदी उपस्थित होते. प्रकल्पपूर्तीसाठी मदत करणारे राजोबा आणि त्यांचे सहकारी, विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजीत यादव, विजय पोवार आणि त्यांचे सर्व सहकारी, डॉ. गिरीश कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या श्रीमती जोशी व श्रीमती कुंभार यांच्यासह जैन श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगवान महावीर अध्यासन हे लोकवर्गणीतून उभे करण्याचे शिवाजी विद्यापीठाने ठरवले आणि त्यानुसार लोकवर्गणीसाठी आवाहन करण्यात आले. त्यामधून सुमारे १ कोटी ११ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असून त्यामधूनच पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. या कामासाठी ८४ लाख ५ हजार ४०१ रुपये इतका खर्च प्रस्तावित असून १२ महिन्यांत हे काम पूर्ण करावयाचे आहे. सांगलीचे प्रमोद चौगले हे या कामाचे वास्तुविशारद आहेत.

19 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फसवणूक टाळण्यासाठी खरेदीची पावती घ्या

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर; शिवाजी विद्यापीठात ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १८ : 'सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे ग्राहकांची अनेकवेळा फसवणूक होत असते. त्यासाठी ग्राहकांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. ग्राहकांनी आपली होणारी फसवणूक टाळण्यासाठी वस्तू खरेदी करताना त्याची पावती घ्यावी', असे आवाहन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग शिक्षणशास्त्र सभागृहात आयोजित ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त उदय लोहोकारे उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळेत निबंध स्पर्धेतील निवड झालेल्या उमेदवारांना पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देण्यात आली. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'ग्राहकांनी आपली होणारी फसवणूक टाळण्यासाठी वस्तू खरेदी करताना पावती घ्यावी, जर भविष्यात खरेदी केलेल्या वस्तूवर क्लेम करावा लागला तर त्यावेळी आपल्याकडे पुरावा असणे आवश्यक आहे, याची काळजी ग्राहकांनी घ्यावी. ग्राहक पंचायतीचे काम हे समाजासाठी सेवेचे व ग्राहकांना दिशा देणारे आहे. या पंचायतीने कार्याची व्याप्ती वाढवावी. त्याला शासनाकडून सहकार्य केले जाईल.'

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद आणि बिंदूमाधव जोशी यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. महाराष्ट्र ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. ग्राहक जनजागृतीपर निबंध स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना पालकमंत्री आबिटकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार, ग्राहक पंचायतीच्या कोषाध्यक्ष सुनीता राजे घाटगे, कोल्हापूर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष प्रवीण खोत, ग्राहक पंचायत जिल्हा अध्यक्ष बी. जे. पाटील, सुधाकर भदरगे, सतीश फणसे, सुरेश माने, अशोक पोतनीस, संजय पोवार, दादासाहेब शेलार उपस्थित होते.

19 APR 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्राहक पंचायतीचे काम गतिमान करा

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर : शिवाजी विद्यापीठात ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळा

- ग्राहकांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे
- ग्राहकांना न्याय देण्यासाठी राज्य शासन आपल्या पाठीशी

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्राहकांनी वस्तू खरेदी केल्यानंतर त्या वस्तूबाबत जर ग्राहकांची तक्रार असेल तर त्या ग्राहकाला लवकर न्याय मिळावा, यासाठी ग्राहक पंचायत चळवळीचे काम अधिक गतिमान करावे, अशा सूचना पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या.




कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त उदय लोहोकारे आदी.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग शिक्षण शास्त्र सभागृहात आयोजित ग्राहक कार्यकर्ता एक दिवसीय कार्यशाळेवेळी ते बोलत होते. ग्राहकांना आवश्यक ते सहकार्य करून न्याय देण्यासाठी राज्य शासन आपल्या पाठीशी असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त उदय लोहोकारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री आबिटकर म्हणाले, धावपळीच्या जीवनशैलीमुळे ग्राहकांची अनेकवेळा फसवणूक होत असते. त्यासाठी ग्राहकांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. ग्राहक पंचायतीचे काम हे समाजासाठी सेवेचे व ग्राहकांना दिशा देणारे आहेत. समाजासाठी अहोरात्र ग्राहकांना वेगवेगळ्या माध्यमातून जागृतीच काम या ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून होत असून याची व्याप्ती अजून वाढवावी जेणेकरुन समाजासाठी अधिक उपयुक्त होईल.

महाराष्ट्र ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार, महाराष्ट्राचे ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे, राज्याचे कोषाध्यक्ष सुनिताराजे घाटगे, कोल्हापूर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष प्रविण खोत, ग्राहक पंचायत जिल्हा अध्यक्ष बी.जे. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर भंदरगे आदी उपस्थित होते.

19 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फसवणूक टाळण्यासाठी ग्राहकांमध्ये प्रबोधन आवश्यक

## पालकमंत्री आबिटकर; शिवाजी विद्यापीठात ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे ग्राहकांची अनेकवेळा फसवणूक होत असते. त्यासाठी ग्राहकांचे प्रबोधन होणे गरजेचे असल्याचे मत पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग शिक्षणशास्त्र सभागृहात आयोजित ग्राहक कार्यकर्ता एक दिवसीय कार्यशाळावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ग्राहक कार्यकर्ता कार्यशाळेत बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, उदय लोहोकारे, डॉ. आर. जी. पवार व अन्य.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ग्राहकांनी आपली होणारी फसवणूक टाळण्यासाठी वस्तू खरेदी करताना वस्तू खरेदी केलेल्याची पावती घ्यावी, जर भविष्यात खरेदी केलेल्या वस्तूवर दावा करावा लागला तर त्यावेळी आपल्याकडे पुरावा असणे आवश्यक आहे, याची काळजी ग्राहकांनी घेणे गरजेचे आहे. प्रास्ताविक महाराष्ट्र ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे यांनी केले.

कार्यक्रमास प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त उदय लोहोकारे, डॉ. आर. जी. पवार, राज्याचे कोषाध्यक्ष सुनीताराजे घाटगे, कोल्हापूर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष प्रवीण खोत, बी. जे. पाटील, सुधाकर भदरगे, सतीश फणसे, सुरेश माने, अशोक पोतनीस, संजय पोवार व शेलार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2025
पुढारी

# सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या योजनांची माहिती घेण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## विद्यापीठ समितीचा निपाणी, बेळगाव, खानापूर परिसरात दौरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बेळगावसह सीमाभागातील विद्यार्थ्यांना मोफत तसेच सवलतीच्या दरात शिक्षण घेता यावे, यासाठी शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांत राखीव जागांसह अनेक सवलती देण्यास गेल्या तीन वर्षांपासून सुरुवात केली आहे. यंदाही या उपक्रमाची माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक शिष्टमंडळाने सीमाभागातील विविध ठिकाणांना भेटी देऊन विद्यार्थी, पालकांशी संवाद साधला. त्यांना ३० एप्रिलपर्यंत प्रवेश अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले. या मोहिमेला पालक-विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून बेळगावसह सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रमात १० टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत. विज्ञान, वाणिज्य, कला व ललित कला यांसह अभियांत्रिकी अभ्यासक्रमांनाही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येऊ शकणार आहेत. यामध्ये अनुदानित अभ्यासक्रमांसाठी ट्यूशन फी पूर्ण माफ असून विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५ टक्के सवलत देण्यात येते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या विविध सवलती व योजनांची माहिती देताना डॉ. जगन कराडे. शेजारी इतर.

त्याखेरीज वसतिगृहात राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शुल्कात सवलत आहे. इतरही अनेक सुविधा सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसवर उपलब्ध आहेत. या योजनेची प्रत्यक्ष माहिती देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती गठित केली आहे.

या समितीचे सदस्य डॉ. जगन कराडे, डॉ. नवनाथ वळेकर, डॉ. श्रीपाल गायकवाड, डॉ. कविता वड्राळे आणि डॉ. संतोष सुतार यांनी गेल्या आठवडाभरात निपाणी, खानापूर, बेळगाव, उदगीर आणि भालकी या ठिकाणांना भेटी दिल्या. स्थानिक महाराष्ट्र एकीकरण समिती पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यातून इच्छुक विद्यार्थी आणि पालक यांच्याशी संवाद साधण्यात आला.


निपाणी येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने यांच्या हस्ते विद्यापीठाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी जयराम मिरजकर, बाबासाहेब मगदूम, उदय शिंदे, राजू मिस्त्री उपस्थित होते. खानापूर येथील बैठकीला गोपाळ मुरारी पाटील, आबासाहेब दळवी, संजीव पाटील, हेब्बाळकर गुरुजी, अमृत शेलार, राजाराम देसाई, पुंडलिक पाटील, अजित पाटील, केशव कळेकर उपस्थित होते. बेळगाव येथील कार्यक्रमास प्रकाश मरगाळे, मालोजी अष्टेकर, शिवराज पाटील, दत्ता उघाडे, महेश जुवेकर यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 APR 2025

सकाळ

# विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी साळोखे


अनिल साळोखे


विजय इंगवले

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अनिल विजयराव साळोखे यांची, तर विजय भीमराव इंगवले यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. कोल्हापूर शहर सहकारी संस्था उपनिबंधक नीलेश डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन अध्यक्ष, उपाध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक विजय पाटील, राजेंद्र चव्हाण, सातापा साळोखे, दीपक काशीद, सचिन नाळे, शशिकांत साळुंखे, सागर चौरे, विनय पाटील, सागर लांडे, सुरेश पाटील, राकेश डोंगरे, शीतल सरनाईक, वंदना गुरव, नितीन लोहार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 APR 2025
सकाळ



तिसंगी : येथील म. ह. शिंदे महाविद्यालयात अग्रणी कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना प्राचार्य डॉ. आर. एस. पोंदे, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. सुरेश शिखरे, प्रा. ए. सी. भोसले, प्रा. ए. बी. मोहिते आदी.

# अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत शिंदे महाविद्यालयात कार्यशाळा

साळवण, ता. १८ : तिसंगी (ता. गगनबावडा) येथील म. ह. शिंदे महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावरील कार्यशाळा उत्साहात झाली.

कार्यशाळेचे उद्‌घाटन रोपाला पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळ निवडेचे सचिव स्वप्नील शिंदे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. पोंदे होते.

दिवसभर झालेल्या कार्यशाळेमध्ये शहाजी महाविद्यालय, कोल्हापूरमधील डॉ. सुरेश शिखरे यांनी 'समाज बांधण्यासाठी विविधतेचे स्वागत : लोकशाही संविधान आणि निवडणूक', प्रा. ए. सी. भोसले यांनी 'सह. अभ्यासक्रम', डॉ. प्रकाश कुंभार यांनी 'समुदाय (समाज) प्रतिबद्धता कार्यक्रम (उपक्रम)' या विषयावर व्याख्याने दिली. अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक डॉ. प्रकाश कुंभार यांनी प्रास्ताविक आणि स्वागत केले. प्रा. अनिल मोहिते यांनी आभार मानले. डॉ. शर्वरी मेंगाणे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.